१६ जुलै २०१६

# विवेक पत्र

F.Y.B.Sc.






## सैराट जातीभेदाविरुद्ध क्रांतीची मशाल: प्रा. सचिन गरुड

नागराज मंजुळेच्या चित्रपटांमधून भारतीय जातीसमाजाची आणि स्त्री–पुरुष विषमतेची वास्तवता प्रखरपणे अभिव्यक्त होत आहे.म्हणून जातीव्यवस्थाविरोधात आणि स्त्रीहक्कासाठी संघर्ष करणा–या चळवळी आणि जनतेकडून या चित्रपटांना मोठा प्रतिसाद मिळत आहे. चित्रपटांमधून वास्तवता कलात्मक पध्दतीने अभिव्यक्त करणारा नागराज मंजुळे हा भारतीय सिनेमाचा दुसरा सत्यजित राय होय, असे महत्त्वपूर्ण प्रतिपादन प्रा.सचिन गरुड यांनी केले.

येथील कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमधील विज्ञान विभागातर्फे प्रकाशित होणा–या 'विवेकपत्रा'च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कॉलेजचे उपप्राचार्य डॉ. नितीन शिंदे हे होते. प्रमुख वक्ता म्हणून प्रा. गरुड यांनी " फॅन्ड्री ते सैराट: नागराज मंजुळेच्या चित्रपटांतील भेदक समाजवास्तव " या विषयावर व्याख्यान दिले.

प्रा. सचिन गरुड म्हणाले की," मोठया विद्यापीठांमधून जगभरात वेगवेगळ्या अंगाने जगभरातील चित्रपटांचा ॲकॅडमिक स्तरावर अभ्यास होत आहे. आपल्या विद्यापीठांमधून तसा काही खास प्रयत्न होताना दिसत नाही. आपल्या जनतेची चित्रपट–साक्षरता फारशी प्रगल्भ नाही. बाजार व अवास्तवता यांचा भरणा असलेला हिंदी सिनेमा जातीय व लिंगभेदात्मक विषम वास्तव हेतुत: दाखवित नाहीत. जागतिकीकरणोत्तर बदलत्या व वाढत्या नवमध्यमवर्गामुळे या चित्रपटांना मोठे मार्केट उपलब्ध झाले आहे. भारतीय चित्रपटांमध्ये तंत्रात्मक व आशयात्मक बदलही घडत आहेत. तथापि जातीय व लिंगभेदात्मक विषम वास्तव या चित्रपटांनी पुढे आणले नाही. चित्रपटनिर्मिती, त्याचे अर्थकारण गँगस्टरीझम, कॉर्पोरेटकंपन्या यांच्या ताब्यात राहिल्याने गरीब, मागास समाजघटकांना त्यांची प्रतिभा व्यक्त करण्यास वावच ठेवला जात नाही. परंतु आता थोडा फार अवकाश मिळत आहे. बहुजन–दलित जनतेच्या वास्तवाला भिडणारा सिनेमा नागराज त्यामुळेच देवू शकत आहे. यापूर्वी असे वास्तवाभिमुख सिनेमे फक्त सत्यजित रायच देवू शकले. "

प्रा. गरुड यांनी असेही मांडले की," उच्चजातीवर्गाने भारतीय चित्रपटांचा जनक दादासाहेब फाळके यांना घोषित करताना ऐतिहासिक चूक केली आहे. तो मान कोल्हापूरच्या राजर्षी शाहू महाराजांच्या प्रेरणेने पहिला मूकपट दादासाहेब तोरणे व बाबुराव पेंन्टर यांनी तयार केला होता, म्हणून त्यांना दिला पाहिजे."

" नागराज मंजुळेच्या चित्रपटात जातीव्यवस्था व पुरुषसत्ता यांचे धारदार चित्रण येते. सैराटचे समर्थक आणि विरोधक असे दोन गट पडलेले दिसतात. परंतु सैराटने वास्तवच दाखविले आहे. जातीपुरुषसत्तेमुळे तरुणांना निखळ प्रेमही करता येवू नये, ही भीषण स्थिती आहेच. महाराष्ट्रात अनेक आंतरजातीय विवाहाच्या प्रकरणांमध्ये खुनखराबा व ऑनरकिलिंगच्या घटनाही घडलेल्या आहेत.सैराट हेच दाखवित आहे.सैराटमधील नायिका ही व्यवस्थेची चौकट मोडणारी आहे. "

## सूत्रसंचालक



## सत्कार समारंभ





## विद्यार्थी मनोगत



